# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या (तातडीच्या) १७० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि. ०५ मार्च, २०२४ दुपारी १२:३० वा.



NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १७० वी (तातडीची) बैठक मंगळवार, दि.२७/०२/२०२४ रोजी दुपारी १२:३० वा. Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे मा.कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने बैठकीचे उर्वरीत कामकाज **मंगळवार, दि.०५/०३/२०२४ रोजी दुपारी १२:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृहात प्रत्यक्ष पध्दतीने पुढे पार पडले.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| १०) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ११) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १६) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १७) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई नामनिर्देशित) | सदस्या | उपस्थित |
| १८) | डॉ. शैलेंद्र देवळाणकर, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य | अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| २०) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. मलिक सगाजी रोकडे<br>प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत, श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील व डॉ. अजित माधव पाटणकर यांनी दुरध्वनीद्वारे/पत्राद्वारे/Whatsapp द्वारे अनुपस्थिती कळविली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | **विद्यापीठात विद्यार्थी तक्रार निवारणसाठी लोकपाल पदी प्रा. सुहास पेडणेकर, निवृत्त कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्या नियुक्तीबाबत केलेली कार्यवाही माहितीस्तव.**<br>टिपणी: भारताचे राजपत्र असाधारण भाग ३ खंड ४ अन्वये, मंगळवार, दि.११/०४/२०२३ रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या राजपत्रातील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नोटीफीकेशन मधील (Student Grievances Redressal Cell) Regulation २०२३ च्या नियम क्र.६(१) अन्वये दि.०८/०९/२०२३ रोजीच्या मान्यते अन्वये प्रभारी कुलगुरु प्रा. डॉ. राजनीश कामत यांनी लोकपाल म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे चे निवृत्त कुलगुरु डॉ. नितीन करमाळकर यांची नियुक्ती केली होती. डॉ. नितीन करमाळकर यांना विविध कार्यालयीन कामकाजासाठी विभागाकडून संपर्क करण्यात आला असता त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे सदर बाब मा.कुलगुरु महोदय यांच्या माहितीसाठी सादर केली असता, भारताचे राजपत्र असाधारण भाग ३ खंड ४ अन्वये, मंगळवार, दि.११/०४/२०२३ रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या राजपत्रातील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नोटीफीकेशन मधील (Student Grievances Redressal Cell) Regulation २०२३ च्या नियम क्र.६ अन्वये मा.कुलगुरु महोदय यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे चे निवृत्त कुलगुरु डॉ. नितीन करमाळकर यांच्या ऐवजी प्रा. सुहास पेडणेकर, निवृत्त कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांची नियुक्ती केली आहे. तरी मा.कुलगुरु महोदय यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव. | विद्यार्थी विकास विभाग |
| ठराव: | **विद्यापीठात विद्यार्थी तक्रार निवारणसाठी लोकपाल पदी प्रा. सुहास पेडणेकर, निवृत्त कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्या नियुक्तीबाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ०२ ]</td><td>दि.२६/०२/२०२४ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.२६/०२/२०२४ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.<br>टिपणी: दि.२६/०२/२०२४ रोजी झालेल्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statute No.S.३२४ नुसार वित्त व लेखा समितीची व व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. दि.२६/०२/२०२४ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला दि.२६/०२/२०२४ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.</td><td>वित्त व लेखा विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>दि.२६/०२/२०२४ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.२६/०२/२०२४ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील अटींच्या अधिन राहून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>१) सदर कार्यारंभ आदेश सुरवातीला १ वर्षासाठी देण्यात यावा आणि कामकाज समाधानकारक असल्यास पुढील कालावधीसाठी Work Order देण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.<br>२) संबंधित फर्मला देयक अदा करण्यापूर्वी सदर देयकाची पडताळणी खालील समितीकडून करुन घेण्यात यावी व सदर समितीच्या शिफारशीअंती देयक अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.
<table>
<tr><td>१)</td><td>अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२)</td><td>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३)</td><td>संगणशास्त्र संकुलातील एक प्राध्यापक/ सहयोगी प्राध्यापक/सहायक प्राध्यापक</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४)</td><td>यंत्रणा विश्लेषक</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>५)</td><td>वित्त व लेखा अधिकारी</td><td>सदस्य-सचिव</td></tr>
</table>
३) या संदर्भात आलेला सर्व खर्चाचा तपशिल प्रत्येक वर्षी व्यवस्थापन परिषदेसमोर माहितीसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय विभाग व शैक्षणिक संकुल यांचे करिता कुरिअर सेवा देणे कामी न्युनतम दर असलेले फर्म मे. श्री माऊली कुरिअर सर्व्हिस, सोलापूर यांना दरकरारानुसार पुरवठा आदेश देणे कामी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.** | जावक विभाग |

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय विभाग व शैक्षणिक संकुल यांचेकरिता कुरिअर सेवा देणेकामी न्युनतम दर असलेले मे. श्री. माऊली कुरिअर सर्व्हिस, सोलापूर यांना दरकरारानुसार खालीलप्रमाणे दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

| तपशिल | दर सर्व करासहित पोहोच देणे प्रत्येक २०० ग्रॅमपर्यंत | दर सर्व करासहित पोहोच देणे प्रत्येकी २०० ग्रॅमच्या पुढील दर | टपाल पोहोचण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| सोलापूर शहर | २६ | १६ | २४ तास |
| संपूर्ण सोलापूर जिल्हा | ४५ | २३ | |
| संपूर्ण महाराष्ट्र | ४७ | २६ | २४ ते ४८ तास |
| आंतरराज्य | ५८ | २८ | ७२ ते ९६ तास |

उपरोक्तप्रमाणे टपाल सेवा पुरविण्याकामी दर व कालावधी ठरविण्यात आलेला असून दरकरार, पुरवठा आदेश, सुरक्षा ठेव स्वीकारणे इ. कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तथापि, नजिकच्या कालावधीत व्यवस्थापन परिषदेची बैठक आयोजित नसल्याने मा. कुलगुरु महोदय यांच्या अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता घेणेकामी दि.०८/०१/२०२४ रोजी टिपणी सादर केली असता, त्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार संबंधितांकडून दरकरार, सुरक्षा ठेव इ. कार्यवाही करुन पुरवठा आदेश दिलेला आहे.

सबब, मे. श्री माऊली कुरिअर सर्व्हिस, सोलापूर यांना प्रस्तुत विद्यापीठात कुरिअर सेवा देणे कामी मा. कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.

ठराव: **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०४ ] | **TOSS Pharm, India Pvt, Ltd सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत सामंजस्य करार करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: TOSS Pharm India Pvt, Ltd व जैवविज्ञान संकुल यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात येणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण, अंतर्गत गुणवत्ता वाढीसाठी तसेच गेस्ट लेक्चरसाठी व प्रयोगशाळेतील विकसित केलेल्या नाविण्यपूर्ण प्रक्रिया व तंत्रज्ञानासाठी देखील फायदा होणार आहे. सदर सामंजस्य कराराचा मसूदा नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या विभागाकडील MoU Committee कडून तपासून घेतला असून सदर सामंजस्य करार करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१ (झ) नुसार व्यवस्थापन परिषदेची मान्यता घ्यावी लागणार आहे. सदर करार मसूदा MoU समितीकडून तपासून घेतला आहे.<br>सबब, सदर सामंजस्य कराराचा मसूदा व कराराची बाब विचारार्थ. | **जैवविज्ञान संकुल** |
| ठराव: | **TOSS Pharm, India Pvt, Ltd सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत सामंजस्य करार करण्यास सवानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०५ ] | **विद्यापीठातील नियमित अधिकारी व कर्मचाऱ्यांची जादा कामाचा दर वाढविणेकामी अधिसभेने केलेला ठरावा विचारार्थ.** | आस्थापना विभाग |

टिपणी: १) डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी विद्यापीठामध्ये प्रशासकीय कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने व कामाचा व्याप पाहता सदर कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेनंतर किंवा सुट्टीच्या दिवशी जादा काम करावे लागते, त्यापोटी त्यांना मिळणारे जादा कामाचा दर हे महागाई दराच्या तुलनेने खूपच कमी असल्याने जादा काम केल्यानंतर मिळणाऱ्या दरामध्ये सुधारणा करण्याकविषयी अधिसभेमध्ये विषय क्र.२६ ला अनुसरुन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला आहे.

"सदरचा ठराव डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी मांडला. त्यास डॉ. भगवान नागनाथ आदटराव यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला."

२) याबाबत दि.२६/०६/२०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या विषय क्र.१९ अन्वये दि.०१/०७/२०१३ पासून विद्यापीठातील नियमित अधिकारी व कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे अतिकालीक भत्ता (Over Time) अदा करण्यात येतो.

| अ. क्र. | तपशील | दर (प्रति तास) |
|---|---|---|
| १) | वर्ग १ मधील उपकुलसचिव व समकक्ष अधिकारी | ५०/- |
| २) | वर्ग १ मधील सहायक कुलसचिव व समकक्ष अधिकारी | |
| ३) | वर्ग २ मधील कक्ष अधिकारी व समकक्ष अधिकारी | ४५/- |
| ४) | वर्ग ३ मधील सहायक कक्ष अधिकारी व समकक्ष अधिकारी | ४०/- |
| ५) | वर्ग ३ मधील वरिष्ठ लिपिक व समकक्ष अधिकारी | |
| ६) | वर्ग ३ मधील कनिष्ठ लिपिक व समकक्ष अधिकारी | |
| (७) | वर्ग ४ मधील सर्व कर्मचारी | ३०/- |

३) दरम्यानच्या काळात महाराष्ट्र शासन, वित्त विभागाने दि.०७/०८/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये वाहनचालक पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांचे जादा कामाचे दर प्रती तास रु.१००/- एवढे करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने दि.१५/०९/२०२३ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.१० अन्वये विद्यापीठातील वाहनचालकांचे ९ तासापेक्षा जास्त काम केल्यास प्रतीतास रु.१००/- याप्रमाणे वाढविण्यात आले आहे.

४) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.१९/०९/२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये २१० शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी पदे मंजूर असून त्यापैकी सद्यस्थितीला १६० कर्मचारी कार्यरत आहेत. म्हणजेच ५० पदे रिक्त आहेत. त्यामुळे रिक्त पदांचा कामाचा अतिरिक्त ताण कार्यरत कर्मचाऱ्यांवर पडत आहे.

| | | |
|---|---|---|
| | ५) सद्यस्थितीला विद्यापीठामध्ये सर्व शैक्षणिक संकुले व प्रशासकीय विभाग मिळून जवळपास ३५ ते ४० विभाग अस्तित्वात असून त्यामध्ये परीक्षा विषयक, प्रवेश विषयक, पात्रता विषयक, वित्त व लेखा विषयक, अभ्यासक्रम विषयक, आस्थापना विषयक तसेच इतर प्रशासकीय विभागाव्यतिरिक्त सद्यस्थितीला विद्यापीठाकडे एकुण ११ शैक्षणिक संकुले असून त्यामध्ये कार्यरत व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांना शैक्षणिक सेवा देण्याचे काम विद्यापीठातील नियमित कर्मचाऱ्यांकडून करण्यात येते. सदर घटकांची वेळेत कामे करुन देणेकामी कर्मचारी संख्या कमी असल्याने सर्व संकुले व प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियमित कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त जादा वेळी काम करुन कामांचा निपटारा करावे लागते.<br>६) विद्यापीठामध्ये अस्तित्वात असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ कर्मचारी संघटनेकडून अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनानुसार (उदा.एखाद्या कर्मचाऱ्याचे मूळ वेतन रु.३०,०००/- असेल एका दिवसाचे मूळ वेतन १,०००/- नियमित कमाचे तसास ८ याप्रमाणे एका तासाचे १२५ इतक्या मूळवेतनाप्रमाणे मोबदला) प्रति तास जितके मूळ वेतन निश्चित होईल त्याप्रमाणे त्या त्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जादा तासाचा मोबदला मिळणेबाबत वारंवार विनंती करण्यात आलेली आहे.<br>७) तसेच नजीकच्या काळात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या जादा कामाच्या मोबदल्यामध्ये वाढ केल्याचे कळते.<br>८) विद्यापीठाकडून शिक्षक व कर्मचाऱ्यांकरीता रिक्षा भाडे रु. ५०/- चे रु.२००/- गोपनीय भत्ता रु.७५/- चे रु.१००/- व शिक्षकांचे दैनिक भत्ता रु.९०/- ते रु.४००/- करण्यात आले असून विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा जादा कामाचा मोबदल्यामध्ये ०१/०७/२०१३ पासून बदल करण्यात आले नाहीत. त्यामुळे विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा जादा कामाच्या मोबदल्यामध्ये वाढ करणे फारच आवश्यक आहे.<br>सबब, विद्यापीठातील नियमित अधिकारी व कर्मचाऱ्यांची जादा कामाचा दर वाढविणेकामी अधिसभेने केलेला ठराव विचारार्थ. | |
| ठराव: | **विद्यापीठातील नियमित अधिकारी व कर्मचाऱ्यांचा जादा कामाचा दर वाढविणेबाबत चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, सदरबाबत शासन निर्णयातील तरतूद पाहावी व तसे असल्यास वर्ग ३ मधील कर्मचाऱ्यांना रु.४०/- वरुन रु.६०/- प्रती तास आणि वर्ग ४ मधील कर्मचाऱ्यांना रु.३०/- वरुन रु.५०/- प्रती तास एवढा जादा कामाचा मोबदला वाढवावा. तसेच वर्ग १ व वर्ग २ यांना जादा कामाचा मोबदला शासन निर्णयानुसार देय नसल्याने तो देणे बंद करावे असे सर्वानुमते ठरले.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ०६ ]</td><td>परीक्षा व मूल्यमापन विभागासाठी संगणक तज्ञ (आय.टी. CSE) व NET & Hardware Expert, Programmer-१, Data Entry Operator-६ ही तांत्रिक पदे खासगी कंत्राटदाराकडून उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: परीक्षा व मूल्यमापन विभाग यांनी दि.२९/०२/२०२४ च्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये मा.प्र-कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली परीक्षा व मूल्यमापन विभागातील सर्व अधिकारी व कायम कर्मचारी यांची बैठक दिनांक ३० डिसेंबर, २०२३ रोजी दुपारी ०१.०० वा. विद्यापीठ सभागृहात आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडला असून त्या कार्यवृत्तांतामध्ये ठराव क्र.७ खालीलप्रमाणे झालेला होता. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे कर्मचारी परीक्षा व मूल्यमापन विभागास उपलब्ध करुन द्यावेत असे दि.०६/०१/२०२४ रोजीच्या टिपणीन्वये कळविलेले होते. तसेच दि.१६/०१/२०२४ अन्वये तांत्रिक पदांची शैक्षणिक अर्हता यापूर्वी कळविलेली आहे. तसेच मा.कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.२२ फेब्रुवारी, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये परीक्षा व मूल्यमापन विभगस तांत्रिक कर्मचारी त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधित विभागास कळविण्याची कार्यवाही करावी असे मा.कुलगुरु महोदय यांनी आदेश दिलेले आहे.<br><table><tr><td>ठराव क्र.७:</td><td>संगणक विभागास संगणक तज्ञ (आय.टी.CSE) व NET & Hardware Expert, Programmer-१, Data Entry Operator-६ देण्याचे ठरले.</td></tr></table>उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने परीक्षा व मूल्यमापन विभागास कर्मचारी उपलब्ध करुन द्यावेत असे कळविलेले आहे.<br>त्याअनुषंगाने सादर करण्यात येते की, विद्यापीठाच्या ई-निविदाच्या जाहिरातीमध्ये Data Operator व संगणक लेखनिक ही दोन्ही पदे नमूद आहेत. तसेच संगणक तज्ञ (आय.टी. CSE) व NET & Hardware Expert, Programmer ही पदे नमूद नाहीत.<br>सबब, परीक्षा व मूल्यमापन विभागासाठी संगणक तज्ञ (आय.टी. CSE) व NET & Hardware Expert, Programmer-१, Data Entry Operator-६ ही तांत्रिक पदे खासगी कंत्राटदाराकडून उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ.</td><td>आस्थापना विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>परीक्षा व मूल्यमापन विभागासाठी खालीलप्रमाणे तांत्रिक पदे खासगी कंत्राटदाराकडून आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच त्यांना द्यावयाचे वेतन खालीलप्रमाणे देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.<br><table><tr><th>अ.क्र.</th><th>पदाचे नाव</th><th>पदाची संख्या</th><th>प्रती महिना द्यावयाचे वेतन</th></tr><tr><td>१)</td><td>संगणक तज्ञ (आय. टी. ESE)</td><td>०१</td><td>५०,०००/-</td></tr><tr><td>२)</td><td>Network & Hardware Expert</td><td>०१</td><td>४०,०००/-</td></tr><tr><td>३)</td><td>Programmer</td><td>०१</td><td>४०,०००/-</td></tr><tr><td>४)</td><td>Data Entry Operator</td><td>०६</td><td>३०,०००/-</td></tr><tr><td colspan="4">सदर कर्मचाऱ्यांची तज्ञता ही माहिती व तंत्रज्ञान समितीकडून पडताळणी करुन घेण्याचे सर्वानुमते ठरले.</td></tr></table></td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ ] | **परीक्षा व मूल्यमापन विभागास आवश्यक असलेले OSM किंवा Non OSM करुन घेण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: परीक्षा व मूल्यमापन विभागाकडील परीक्षेच्या कामकाजात ICT चा उपयोग करण्यासंदर्भात श्री. राजेश अग्रवाल समितीने सुचविलेल्या उपाय योजनानुसार परीक्षेच्या कामाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. विद्यापीठाच्या परीक्षा ही **(अ)** सरदची प्रक्रिया अभियांत्रिकी, फार्मसी, आक्रिटेक्चर, एम.बी.ए., एम.सी.ए., एम.कॉम, एम.ए., एम.एस्सी. सर्व अभ्यासक्रम इत्यादी OSM पध्दतीने मध्यवर्ती मूल्यमापनाचे काम यशस्वीरित्या करावयाचा असून **(ब)** सदरची प्रक्रिया बी. ए., बी.कॉम, बी.एस्सी, बी.सी.ए., बी.बी.ए या सर्व अभ्यासक्रम इत्यादी NONOSM पध्दतीने म्हणजे पहिले पान स्कॅनिंग करून काम यशस्वीरित्या करावयाचे आहे.<br>वरीलप्रमाणे **अ** आणि **ब** पध्दतीने काम करण्याकरीता ई-निविदा मागवून करावे लागणार आहे. सदर काम एका सत्रासाठी **अ** पध्दतीने राबविण्यासाठी अंदाजे रु.१५,००,०००/- आणि **ब** पध्दतीने राबविण्यासाठी अंदाजे रु.७,५०,०००/- इतका असून अ आणि ब मिळून एकुण रु.२२,५०,०००/ इतका अपेक्षित असून सदरचे काम ई-निविदा मागवून करणेची बाब विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | **परीक्षा व मूल्यमापन विभागास आवश्यक असलेले OSM किंवा Non OSM करुन घेण्यासाठी** Scanning, ICR, OCR, Digitization of Students Marksheet, Answer Sheet (OSM & Non-OSM) Records and Web Portal Development **याकरिता ई-निविदा मागवून सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच ई-निविदेच्या अटी, शर्ती व ई-निविदा मूल्य** (Tender Value) **या बाबी माहिती व तंत्रज्ञान समितीकडून अंतीम करुन घेण्यात यावे असे ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०८ ] | **ICTRD, व्हेरीटोस व Splashgain Software कंपनीच्या परीक्षा व इतर विभागातील कामकाजातील अकार्यक्षमतेमुळे सदर कंपनीला ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्याची अधिसभेने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: दि.०७ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीमध्ये विषय क्र.११ वर खालीलप्रमाणे ठराव झालेला असून सदर विषय व ठराव व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ सादर.<br>याबाबत सादर करण्यात येते की, ICTRD, व्हेरीटोस व Splashgain Software कंपनीच्या परीक्षा व इतर विभागातील कामकाजातील अकार्यक्षमतेमुळे सदर कंपनीला ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्याची अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे. त्यास अनुसरुन सदरचा ठराव डॉ. भगवान नागनाथ आदटराव यांनी मांडला. त्यास श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.<br>सबब, ICTRD, व्हेरीटोस व Splashgain Software कंपनीच्या परीक्षा व इतर विभागातील कामकाजातील अकार्यक्षमतेमुळे सदर कंपनीला ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्याची अधिसभेने केलेली शिफारस विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | **ICTRD, व्हेरीटोस व Splashgain Software कंपनीच्या परीक्षा व इतर विभागातील कामकाजातील अकार्यक्षमतेमुळे सदर कंपनीला ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्याची अधिसभेने केलेली शिफारस खालील कारणास्तव सर्वानुमते अमान्य करण्यात आली.**<br>**१. सदर कंपन्यांविरुध्द कोणतीही लेखी तक्रार विद्यापीठाकडे आलेली नाही.**<br>**२. सदर कंपन्यांना ब्लॅकलिस्ट केल्यास त्यांच्याकडील विद्यापीठाच्या डेटापासून आपणास वंचित रहावे लागेल.**<br>**३. नवीन कंपनीस डेटा मायग्रेट (Migrate) व इंपोर्ट (Import) करण्यास बराच कालावधी लागणार आहे आणि आपणाकडे सध्या कोणतीही पर्यायी व्यवस्था नाही.**<br>**या कारणास्तव मार्च/एप्रिल, २०२४ च्या परीक्षेचे काम संबंधित कंपनीस देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली व पर्यायी व्यवस्थेची तात्काळ व्यवस्था करणेची प्रक्रिया सुरु करावी असे ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०९ ] | **विद्यार्थ्यांच्या परीक्षा संबंधित सर्व रेकॉर्ड अद्यावत ठेवण्यासाठी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचे अद्यावत डेटा सेंटर सुरु करण्याची अधिसभेने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: दि.०७ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीमध्ये विषय क्र. १२ वर खालीलप्रमाणे ठराव झालेला असून सदर विषय व ठराव व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ सादर.<br>याबाबत सादर करण्यात येते की, डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी विद्यार्थ्यांच्या परीक्षा संबंधित सर्व रेकॉर्ड अद्यावत ठेवण्यासाठी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचे अद्यावत डेटा सेंटर सुरु करण्याबाबत अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे. त्यास अनुसरुन सदरचा ठराव डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी मांडला. त्यास डॉ. शिरीष नागनाथ भोसले यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.<br>सबब, विद्यार्थ्यांच्या परीक्षा संबंधित सर्व रेकॉर्ड अद्यावत ठेवण्यासाठी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचे अद्यावत डेटा सेंटर सुरु करण्याची अधिसभेने केलेली शिफारस विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | **विद्यार्थ्यांच्या परीक्षा संबंधित सर्व रेकॉर्ड अद्यावत ठेवण्यासाठी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचे अद्यावत डेटा सेंटर सुरु करण्याची अधिसभेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १० ] | **प्रस्तुत विद्यापीठामध्ये प्रवेश परीक्षा व इतर संबंधित कामासाठी विविध प्रकारचे सॉफ्टवेअर वापरले जाते. सदर कामात सुसूत्रता आणण्यासाठी अनुभवी व सक्षम एकाच कंपनीला काम देण्याची अधिसभेने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: दि.०७ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीमध्ये विषय क्र.१६ वर खालीलप्रमाणे ठराव झालेला असून सदर विषय व ठराव व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ सादर.<br>याबाबत सादर करण्यात येते की, श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी सध्या विद्यापीठामध्ये प्रवेश परीक्षा व इतर संबंधित कामासाठी विविध प्रकारचे सॉफ्टवेअर वापरले जाते. सदर कामात सुसूत्रता आणण्यासाठी अनुभवी व सक्षम एकाच कंपनीला काम देण्याची अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे. त्यास अनुसरुन सदरचा ठराव श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी मांडला. त्यास ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठामध्ये प्रवेश परीक्षा व इतर संबंधित कामासाठी विविध प्रकारचे सॉफ्टवेअर वापरले जाते. सदर कामात सुसूत्रता आणण्यासाठी अनुभवी व सक्षम एकाच कंपनीला काम देण्याची अधिसभेने केलेली शिफारस विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | **अधिसभेच्या शिफारशीनुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रवेश, परीक्षा व इतर कामांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी एकाच कंपनीला काम देण्याबाबतची प्रक्रिया याआधीच सुरु झालेली आहे व लवकरच त्यानुसार एकाच कंपनीद्वारे विद्यापीठाची विविध कामे केली जातील.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ११ ] | प्रस्तुत विद्यापीठातील मार्च/एप्रिल, २०२४ या सत्रासाठी सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग व ऑनस्क्रीन मूल्यमापनासाठी मध्यवर्ती मूल्यमापनासाठी भूशास्त्र संकुलामधील भांडार व मध्यवर्ती मूल्यमापन विभाग येथे एकुण-०६ नग एअरकंडीशनर तसेच सदर ठिकाणी असलेल्या गोदामास सिलिंग, फर्निचर, वायफाय सुविधा, ५०० एम.बी.पी.एस. ची इंटरनेट सुविधा, तसेच आवश्यकतेनुसार इतर सुविधा पुरविण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: मार्च/एप्रिल, २०२४ या सत्रासाठी सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग व ऑनस्क्रीन मूल्यमापनासाठी मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र भूशास्त्र संकुल मधील भांडार व मध्यवर्ती मूल्यमापन विभागामध्ये करण्यात येणार आहे. सदर ठिकाणी असलेल्या गोदामास पीओपी सिलिंग करुन घेणे तसेच एकुण-०६ नग उभ्या एअरकंडीशन मशीन, फर्निचर, व्हायफाय सुविधा, ५०० एम.बी.पी.एस. ची इंटरनेट सुविधा घ्यावी लागणार आहे. जेणेकरुन अद्यावत स्कॅनिंग सेंटर विद्यापीठाच्या विविध परिक्षेसाठी उपयोगात आणता येईल.<br>सदरचे काम विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यास व त्या कामाकरीता होणाऱ्या अंदाजे १५ ते २० लाख रुपये खर्च येण्याची शक्यता आहे.<br>सबब, वरील बाब विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | प्रस्तुत विद्यापीठातील मार्च/एप्रिल, २०२४ या सत्रासाठी सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग व ऑनस्क्रीन मूल्यमापन सद्यस्थितीत पूर्वीच्या ठिकाणी म्हणजेच एन.बी.नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर येथे पूर्वीच्याच अटी/शर्तीसह स्कॅनिंग केंद्र ठेवण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १२ ] | **विद्यापीठाचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी लेखा परीक्षकांच्या पुर्ननियुक्तीची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १३५ (२) नुसार व्यवस्थापन परिषदेने नियुक्त केलेल्या लेखापरिक्षकाकडून विद्यापीठाच्या लेख्याची लेखापरीक्षा करुन घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने दि.१३ जानेवारी, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषद ठराव क्र.४ अन्वये M/s. SKVM & Company, CA Sachin S. Bhattad यांची सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी नियुक्ती करण्यात आली होती.<br>M/s. SKVM & Company, CA Sachin S. Bhattad यांनी दि.११/०२/२०२४ रोजीचे ई-मेल अन्वये विद्यापीठाचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी मागील दराप्रमाणे म्हणजेच ₹१,३५,०००/- अधिक GST १८% प्रमाणे करण्यास तयार असल्याचे कळविलेले आहे. सोबत ई-मेल जोडला आहे.<br>सबब, M/s. SKVM & Company, CA Sachin S. Bhattad यांनी ई-मेलद्वारे विनंती केल्यानुसार त्यांची विद्यापीठाचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी संवैधानिक लेखापरीक्षक म्हणून पुर्ननियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | **विद्यापीठाचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी M/s. SKVM & Company, CA Sachin S. Bhattad यांना संवैधानिक लेखापरीक्षक म्हणून पुर्ननियुक्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच पुढील वर्षी सदर प्रक्रिया माहे डिसेंबर / जानेवारी मध्ये सुरु करावी जेणेकरुन विविध लेखापरिक्षकांमधून एकाची निवड करण्याची प्रक्रिया वेळेत पूर्ण करता येईल असेही ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १३ ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (जे) नुसार, मा. कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाच्या प्रत्येक सहा महिन्यांच्या विकास कार्यक्रमांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**<br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (जे) नुसार, मा. कुलसचिव यांनी विद्यापीठाचा प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा एक अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन दि.०१ जुलै, २०२३ ते ३१ डिसेंबर, २०२३ या कालावधीतील मा. कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाचा विकास कार्यक्रमांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर. | कुलसचिव कार्यालय |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (जे) नुसार, मा. कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाच्या प्रत्येक सहा महिन्यांच्या विकास कार्यक्रमांच्या अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १४ ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७० (३) (c) नुसार एक अधिष्ठाता यांचे स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७०(३)(c) नुसार स्थायी समितीवर खालीलप्रमाणे सदस्याचे नामनिर्देशन करण्याची आहे.<br>कलम ७०(३)(c)- व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेला एक अधिष्ठाता;<br>वरील तरतूदीनुसार दि.१९/०५/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये विषय क्र.४ अन्वये अधिष्ठातामधून प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा यांचे नामनिर्देशन करण्यात आले होते. तथापि, प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा यांची प्र-कुलगुरु पदी नियुक्ती झाल्याने स्थायी समितीवरील अधिष्ठाता मधील पद रिक्त झाले आहे.<br>प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा यांची प्र-कुलगुरु पदी नियुक्ती झाल्याने विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता म्हणून डॉ. प्रशांत मारुती पवार यांचे नामनिर्देशन करण्यात आले असून अधिष्ठातांमधून व्यवस्थापन परिषदेकडून स्थायी समितीवर नवीन नामनिर्देशन करुन घ्यावे लागणार आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७०(३)(c) नुसार वरील अधिष्ठातांमधून एक अधिष्ठाता यांचे स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७० (३) (c) नुसार डॉ. प्रशांत मारुती पवार, प्र.अधिष्ठाता (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा) यांचे स्थायी समितीवर सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[१५(१)]</td><td>
प्रस्तुत विद्यापीठातील कनिष्ठ लिपिक या पदाच्या पदोन्नती कोटयातील रिक्त असलेल्या पदावर व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील नमूद तरतुदीनुसार दि.०१ सप्टेंबर, २०२३ ते ३१ ऑगस्ट, २०२४ या निवडसूची वर्षामध्ये रिक्त होणाऱ्या पदांवर महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र. ३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ मध्ये नमूद तरतुदीनुसार सेवाजेष्ठतेनुसार तात्पुरती पदोन्नती देण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार पदोन्नती दिल्याची बाब माहितीस्तव.
टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातील कनिष्ठ लिपिक या पदाच्या पदोन्नती कोटयामध्ये रिक्त असलेल्या पदावर व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील नमूद तरतुदीनुसार दि.०१ सप्टेंबर, २०२३ ते ३१ ऑगस्ट, २०२४ या निवडसूची वर्षामध्ये रिक्त होणाऱ्या पदांवर पात्र कर्मचाऱ्याला पदोन्नती देणे आवश्यक होते.
उपरोक्तप्रमाणे नमूद केल्यानुसार कनिष्ठ लिपिक या पदाच्या पदोन्नती कोटयामध्ये रिक्त झालेल्या व दि. ०१ सप्टेंबर, २०२३ ते ३१ ऑगस्ट, २०२४ या निवडसूचीवर्षामध्ये रिक्त होणाऱ्या पदांवर पदोन्नती देण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या विभागीय पदोन्नती समितीची (वर्ग २, ३ व ४) बैठक दि.०७/०२/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता राष्ट्रमाता जीजाऊ माँसाहेब व्यवस्थापन परिषद बैठक कक्ष, मुख्य प्रशासकीय इमारत, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे संपन्न झाली.
विभागीय पदोन्नती समितीने कनिष्ठ लिपिक या संवर्गाच्या पदोन्नती कोटयामध्ये रिक्त असलेल्या पदावर महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र. ३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ मध्ये नमूद तरतुदीनुसार सेवाजेष्ठतेनुसार खालील पात्र कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या पदोन्नतीकरीता शिफारस केलेली असून त्यानुसार कार्यालयीन आदेश क्र. अहोसोविसो/आस्था/पदोन्नती/२०२४/११५७, दि.०७/०२/२०२४ अन्वये खालील कर्मचाऱ्यांना नमूद पदांवर तात्पुरती पदोन्नती देण्यात आले आहेत (सोबत समितीचा अहवाल व कार्यालयीन आदेशांची प्रत जोडलेली आहे.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम</th><th>पदोन्नतीचा पदनाम</th><th>कर्मचाऱ्यांचा प्रवर्ग</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td></tr>
<tr><td>१)</td><td>श्रीमती राख जनाबाई सुदाम, प्रयोगशाळा परिचर</td><td>कनिष्ठ लिपिक</td><td>भटक्या जमाती (ड)</td></tr>
<tr><td>२)</td><td>श्रीमती माने अर्चना खंडेराव, ग्रंथालय परिचर</td><td>कनिष्ठ लिपिक</td><td>खुला</td></tr>
<tr><td>३)</td><td>श्री. जाधव सारंगदेव चंद्रकांत, शिपाई</td><td>कनिष्ठ लिपिक</td><td>विमुक्त जाती (अ)</td></tr>
<tr><td>४)</td><td>श्री. आवटे यशवंत पंडीत, शिपाई</td><td>कनिष्ठ लिपिक</td><td>इतर मागासवर्ग</td></tr>
<tr><td>५)</td><td>श्री. सले राजकुमार शिवाजी, शिपाई</td><td>कनिष्ठ लिपिक</td><td>भटक्या जमाती (ब)</td></tr>
<tr><td>६)</td><td>श्री. गिऱ्हे रमेश गिरजाजी, शिपाई</td><td>कनिष्ठ लिपिक</td><td>अनुसूचित जमाती</td></tr>
<tr><td>७)</td><td>श्रीमती आढाव लक्ष्मी प्रभाकर, शिपाई</td><td>कनिष्ठ लिपिक</td><td>खुला</td></tr>
</table>
</td><td>आस्थापना विभाग</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| ८) | श्री. मुंडफने नितीन संदिपान, प्रयोगशाळा परिचर | कनिष्ठ लिपिक | खुला |
| ९) | श्री. गायकवाड अमोल सत्यवान, शिपाई | कनिष्ठ लिपिक | अनुसूचित जाती |
| १०) | श्री. शिंदे मिलींद मनोहर, शिपाई | कनिष्ठ लिपिक | अनुसूचित जाती |
| ११) | श्री. कोंळी मारुती कल्लप्पा, शिपाई | कनिष्ठ लिपिक | विशेष मागासवर्ग |
| १२) | श्रीमती केत कल्पना सतीश, शिपाई | कनिष्ठ लिपिक | खुला |
| १३) | श्री. नागरगोजे हनुमंत रघुनाथ, शिपाई | कनिष्ठ लिपिक | भटक्या जमाती (ड) |
| १४) | डॉ. साखरे अंजली शैलेश, प्रयोगशाळा परिचर | कनिष्ठ लिपिक | खुला |

तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील नमूद तरतुदीनुसार दि. ०१ सप्टेंबर, २०२३ ते ३१ ऑगस्ट, २०२४ या निवडसूची वर्षामध्ये पदोन्नती कोटयामध्ये रिक्त होणाऱ्या पदांवर खालील कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या पदोन्नतीकरीता शिफारस केलेली असून सदर कर्मचाऱ्यांना संबंधित पद पदोन्नतीकरीता रिक्त झाल्यानंतर आदेश निर्गमित करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम | पदोन्नतीचा पदनाम | कर्मचाऱ्यांचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १) | श्री. देशमुख नशिर बशीरमिया सहायक कक्ष अधिकारी | कक्ष अधिकारी | खुला |
| २) | श्री. काळे शरणप्पा रामलिंग वरिष्ठ लिपिक | सहायक कक्ष अधिकारी | खुला |
| ३) | श्री. चाकुरकर विशाल शिवाजीराव कनिष्ठ लिपिक | वरिष्ठ लिपिक | अनुसूचित जमाती |

सबब, प्रस्तुत विद्यापीठातील कनिष्ठ लिपिक या पदाच्या पदोन्नती कोटयातील रिक्त असलेल्या पदावर व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील नमूद तरतुदीनुसार दि.०१ सप्टेंबर, २०२३ ते ३१ ऑगस्ट, २०२४ या निवडसूची वर्षामध्ये रिक्त होणाऱ्या पदांवर महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र. ३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ मध्ये नमूद तरतुदीनुसार सेवाजेष्ठतेनुसार तात्पुरती पदोन्नती देण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार पदोन्नती दिल्याची बाब माहितीस्तव.

**ठराव:** **प्रस्तुत विद्यापीठातील कनिष्ठ लिपिक या पदाच्या पदोन्नती कोटयातील रिक्त असलेल्या पदावर व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील नमूद तरतुदीनुसार दि.०१ सप्टेंबर, २०२३ ते ३१ ऑगस्ट, २०२४ या निवडसूची वर्षामध्ये रिक्त होणाऱ्या पदांवर महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र. ३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ मध्ये नमूद तरतुदीनुसार सेवाजेष्ठतेनुसार तात्पुरती पदोन्नती देण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार पदोन्नती दिल्याची नोंद घेण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१५(२)] | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे INTI International University Malaysia and Yonsei University South Korea या आंतरराष्ट्रीय विद्यापीठासोबत झालेले सामंजस्य (MoU) करार करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे INTI, International University Malaysia and Aerogel Materials Research Center Yonsei University, South Korea या आंतरराष्ट्रीय विद्यापीठाबरोबर (MoU) करण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठातील MoU Cell च्या दि.२८/१२/२०२३ रोजीच्या बैठकीत MoU Cell चे सदस्य सचिव-कायदा अधिकारी यांनी तपासून दिलेले आहेत.<br>त्यानुसार INTI, International University Malaysia, and Aerogel Materials Research Center Yonsei University, South Korea या आंतरराष्ट्रीय विद्यापीठाबरोबर सामंजस्य (MoU) करार करण्यासाठी दि.२९/०२/२०२४ रोजीच्या पत्राअन्वये मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे सामंजस्य करार करण्यासाठी मान्यता दिलेली आहे.<br>सबब, INTI, International University Malaysia and Aerogel Materials Research Center Yonsei University, South Korea या आंतरराष्ट्रीय विद्यापीठाबरोबर सामंजस्य (MoU) करार करण्याची बाब विचारार्थ. | नवोपक्रम,<br>नवसंशोधन व साहचर्य मंडळ |
| ठराव: | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे INTI International University Malaysia and Yonsei University South Korea या आंतरराष्ट्रीय विद्यापीठासोबत सामंजस्य (MoU) करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१५(३)] | **चेअरमन Pune Chapter of WIRC of ICSI व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ वाणिज्य व व्यवस्थापन संकुल यांच्याबरोबर सामंजस्य (MoU) करार करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: चेअरमन Pune Chapter of WIRC of ICSI व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ वाणिज्य व व्यवस्थापन संकुल यांच्याबरोबर सामंजस्य (MoU) करार करण्यात येणार आहे. या करारामुळे विद्यार्थ्यांना व विद्यापीठाला खालील फायदे मिळू शकतात.<br>१) विद्यार्थ्यांना व विद्यापीठाला ICSI ची सर्व पुस्तके उपलब्ध होतील.<br>२) विद्यापीठात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास सुवर्ण पदकाची संधी.<br>३) विद्यार्थ्यांसाठी Carreer awareness Programme.<br>४) विद्यार्थ्यासाठी Demo ABGM Workshop.<br>५) प्राध्यापकांसाठी Teacher Conference.<br>६) ICSI ने आयोजित केलेल्या प्रोग्राममध्ये विद्यार्थी व प्राध्यापकांना सहभागाची संधी. यामुळे सामंजस्य (MoU) करारामुळे विद्यापीठावर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही.<br>सबब, सामंजस्य (MoU) कराराचा मसूदा व करार करण्याची बाब विचारार्थ. | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल |
| ठराव: | **चेअरमन Pune Chapter of WIRC of ICSI व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ वाणिज्य व व्यवस्थापन संकुल यांच्याबरोबर सामंजस्य (MoU) कराराचा मसूद्यास व करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१५(४)] | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ दि.०१ मार्च २०१७ पासुन सर्व विद्यापीठांना लागु झाला आहे. त्यानुसार विद्यापीठ Common Statutes आणि Ordinance अद्यापपर्यंत प्राप्त झाले नसल्याने, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या Ordinance framed under the provision of the Act, १९९४ मधील दंडक ९ (a) नुसार चेंजिस-इन-स्टाफ या समितीवर व्यवस्थापन परिषद सदस्यांमधून समिती सदस्यांच्या नामनिर्देशनास्तव. | शिक्षक मान्यता विभाग |
| ठराव: | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ दि.०१ मार्च २०१७ पासुन सर्व विद्यापीठांना लागु झाला आहे. त्यानुसार शिक्षकांचे एकरुप परिनियम अद्यापपर्यंत प्राप्त झाले नसल्याने, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या **"Ordinance framed under the provision of the Act, 1994"** मधील दंडक ९ (a) नुसार चेंजिस-इन-स्टाफ या समितीवर व्यवस्थापन परिषद सदस्यांमधून खालील सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले. | |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | अध्यक्ष |
| २) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य |
| ३) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य |
| ४) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य |
| ५) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य |
| ६) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद